# NMMC SCHOOL NO. 93 (CBSE), NERUL

## Monthly Progress Report - June 2026

## ACADEMIC ACHIEVEMENT

### 1. LEAD Observation

On 29th June, our school hosted Ms. Soma Chatterjee, the LEAD Academic Coordinator, for a classroom observation and mentoring visit. The purpose of the visit was to observe newly appointed teachers and provide constructive feedback to support their professional growth during the early weeks of the academic year.

A total of six new teachers were observed across different grades and subjects. Ms. Chatterjee closely reviewed their lesson delivery, classroom management, student engagement, and use of teaching strategies. Following each observation, she conducted one-on-one feedback sessions, appreciating effective practices while sharing practical suggestions to strengthen instructional planning and create more engaging learning experiences for students.

The visit reinforced the importance of continuous coaching and reflective practice. The personalized feedback provided teachers with clear, actionable next steps to enhance their classroom effectiveness and build confidence in their new roles. Such mentoring initiatives contribute to the school's commitment to nurturing excellent educators and ensuring high-quality learning experiences for every child.

२९ जून रोजी आमच्या शाळेत LEAD च्या अकॅडमिक कोऑर्डिनेटर श्रीमती सोमा चॅटर्जी यांनी भेट दिली. या भेटीचा मुख्य उद्देश नव्याने रुजू झालेल्या शिक्षकांच्या अध्यापनाचे निरीक्षण करून त्यांच्या व्यावसायिक विकासासाठी मार्गदर्शन व रचनात्मक अभिप्राय देणे हा होता.

या भेटीदरम्यान विविध इयत्तांमधील आणि विषयांतील एकूण सहा नवीन शिक्षकांचे वर्ग निरीक्षण करण्यात आले. श्रीमती चॅटर्जी यांनी शिक्षकांचे अध्यापन कौशल्य, वर्ग व्यवस्थापन, विद्यार्थ्यांचा सहभाग आणि अध्यापन पद्धतींचे बारकाईने निरीक्षण केले. प्रत्येक निरीक्षणानंतर त्यांनी शिक्षकांसोबत वैयक्तिक संवाद साधून त्यांच्या प्रभावी अध्यापनाचे कौतुक केले तसेच अध्यापन अधिक परिणामकारक आणि विद्यार्थीकेंद्रित करण्यासाठी उपयुक्त सूचना दिल्या.



THE AKANKSHA FOUNDATION MUMBAI-33

अशा प्रकारच्या मार्गदर्शनात्मक भेटींमुळे शिक्षकांना स्वतःच्या अध्यापनाचा विचार करण्याची, नवीन कल्पना आत्मसात करण्याची आणि आपल्या कौशल्यात सातत्याने सुधारणा करण्याची संधी मिळते. उत्कृष्ट शिक्षक घडविणे आणि प्रत्येक विद्यार्थ्याला दर्जेदार शिक्षणाचा अनुभव देणे या शाळेच्या ध्येयाला अशा उपक्रमांमुळे अधिक बळ मिळते.

## 2. Gramangal Professional Development – Independent Learning (IL) Planning Session

A Professional Development (PD) session on Independent Learning (IL) was conducted by Gramangal on 8 June 2026 for teachers involved in IL planning and implementation. The session focused on strengthening teachers' understanding of creating meaningful IL spaces that promote social skills, problem-solving, critical thinking, and independent learning. Teachers explored their role as facilitators by providing scaffolding, establishing clear routines, and offering differentiated support instead of direct instruction.The session introduced practical strategies across five developmental domains—Language & Literacy, Listening & Speaking, Cognitive Development, Physical Development, and Aesthetic & Cultural. Teachers discussed learning corners, station-based activities, and daily observation of 5–6 students to monitor progress effectively. A key decision was to separate Physical Development and Socio-emotional Development into distinct learning areas for improved planning and assessment. Teachers revised their IL plans, incorporated theme-based activities, organized materials from simple to complex, and were encouraged to study the NEP Foundational Years document to strengthen future IL planning.




ग्राममंगल व्यावसायिक विकास (PD) – स्वतंत्र अध्ययन (Independent Learning) नियोजन सत्र

दिनांक ८ जून २०२६ रोजी ग्राममंगलतर्फे स्वतंत्र अध्ययन (IL) नियोजन व अंमलबजावणी करणाऱ्या शिक्षकांसाठी व्यावसायिक विकास (PD) सत्र आयोजित करण्यात आले. या सत्राचा उद्देश विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक कौशल्ये, समस्या सोडविण्याची क्षमता, चिकित्सक विचार आणि स्वयंपूर्ण शिक्षण विकसित करणाऱ्या IL जागांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी शिक्षकांना मार्गदर्शन करणे हा होता. शिक्षकांनी थेट अध्यापनाऐवजी मार्गदर्शक (Facilitator) म्हणून सहाय्य, स्पष्ट नियम आणि विद्यार्थ्यांच्या गरजेनुसार पाठबळ देण्याच्या भूमिकेवर चर्चा केली.सत्रात भाषा व साक्षरता, ऐकणे व बोलणे, संज्ञानात्मक विकास,



THE AKANKSHA FOUNDATION MUMBAI-33

शारीरिक विकास आणि सौंदर्य व सांस्कृतिक विकास या क्षेत्रांसाठी विविध शिक्षण केंद्रे, स्टेशन-आधारित उपक्रम आणि दररोज ५–६ विद्यार्थ्यांचे निरीक्षण करण्याच्या पद्धतींचा अभ्यास करण्यात आला. शारीरिक विकास आणि सामाजिक-भावनिक विकास ही स्वतंत्र क्षेत्रे ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला. शिक्षकांनी त्यानुसार IL नियोजन सुधारित केले, विषयाधारित उपक्रम समाविष्ट केले आणि भविष्यातील नियोजनासाठी NEP Foundational Years दस्तऐवजाचा अभ्यास करण्याचे ठरविले.

3. **Practice Week Professional Development**

A two-week Professional Development (PD) programme, IgnitEd, was conducted from 1–6 June and 10–11 June 2026 to prepare teachers for the new academic year. Approximately 100 staff members, including teachers from Nursery to Grade 9, mentors, coordinators, social workers, performing and visual arts teachers, and newly joined staff, participated in the programme. Sessions covered classroom management, effective questioning, rigorous instruction, class observation, DEAR (Drop Everything and Read) time, transitions, inclusive teaching strategies, developmental milestones, growth mindset, social cohesion, community visits, school policies, and collaborative planning. Teachers also engaged in unit planning, assessment review, performance task design, IL planning, and classroom preparation through dedicated work time. The programme strengthened instructional planning, assessment practices, classroom routines, and collaborative learning. Community visits enhanced teachers' understanding of students' backgrounds, while planning sessions ensured curriculum readiness and consistency across grades. Regular professional development through mentoring, classroom observations, and collaborative planning will continue throughout the academic year to improve student learning outcomes.






THE AKANKSHA FOUNDATION MUMBAI-33

प्रॅक्टिस वीक व्यावसायिक विकास (PD)

नवीन शैक्षणिक वर्षाच्या तयारीसाठी १ ते ६ जून आणि १० व ११ जून २०२६ दरम्यान IgnitEd अंतर्गत दोन आठवड्यांचा व्यावसायिक विकास (PD) कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमात नर्सरी ते इयत्ता ९ पर्यंतचे शिक्षक, मार्गदर्शक, समन्वयक, सामाजिक कार्यकर्ते, परफॉर्मिंग व व्हिज्युअल आर्ट्स शिक्षक तसेच नव्याने रुजू झालेले शिक्षक असे सुमारे १०० कर्मचारी सहभागी झाले. सत्रांमध्ये वर्ग व्यवस्थापन, प्रभावी प्रश्न विचारण्याची कौशल्ये, गुणवत्तापूर्ण अध्यापन, वर्ग निरीक्षण, DEAR वेळ, संक्रमण, सर्वसमावेशक अध्यापन, विकासात्मक टप्पे, ग्रोथ माइंडसेट, सामाजिक सलोखा, समुदाय भेटी, शाळेची धोरणे आणि सहकार्यात्मक नियोजन यांचा समावेश होता. शिक्षकांनी युनिट नियोजन, मूल्यमापन, कार्यआधारित उपक्रम, स्वतंत्र अध्ययन (IL) नियोजन आणि वर्ग तयारीवरही काम केले. या कार्यक्रमामुळे अध्यापन, मूल्यमापन, वर्ग नियोजन आणि सहकार्यात्मक कार्यपद्धती अधिक प्रभावी झाल्या. पुढील काळात मासिक प्रशिक्षण, वर्ग निरीक्षण, मार्गदर्शन आणि सहकार्यात्मक नियोजनाद्वारे शिक्षकांचा व्यावसायिक विकास सातत्याने सुरू राहील.

**3. IS Training – ConnectED**



An in-school ConnectED training was conducted on 9 June 2026 by the Subject Instructional Specialist (IS) for all teaching staff. Teachers were grouped according to their subjects and participated in discussions on designing rigorous instructional practices specific to their disciplines. The session focused on subject-specific teaching strategies, effective lesson planning, and classroom implementation. Teachers also had the opportunity to discuss challenges, clarify doubts, and receive guidance from the Instructional Specialist. The one-day training, held from 8:00 a.m. to 3:30 p.m., strengthened instructional practices and collaborative learning. Similar central PD sessions will continue monthly, with teachers attending on a rotational basis.

IS प्रशिक्षण – ConnectED

दिनांक ९ जून २०२६ रोजी विषय अध्यापन तज्ज्ञ (Instructional Specialist) यांच्या मार्गदर्शनाखाली ConnectED अंतर्गत शाळास्तरीय प्रशिक्षण आयोजित करण्यात आले. सर्व शिक्षकांना विषयानुसार गटांमध्ये विभागून प्रत्येक विषयातील दर्जेदार अध्यापन पद्धती, प्रभावी धडा नियोजन




THE AKANKSHA FOUNDATION MUMBAI-33

आणि वर्गातील अंमलबजावणी यावर चर्चा करण्यात आली. शिक्षकांना त्यांच्या विषयाशी संबंधित अध्यापन कौशल्ये शिकण्याची तसेच अध्यापनातील अडचणी आणि प्रश्न तज्ज्ञांसोबत चर्चून मार्गदर्शन घेण्याची संधी मिळाली. सकाळी ८.०० ते ३.३० या वेळेत आयोजित या प्रशिक्षणामुळे शिक्षकांची विषयाधारित अध्यापन क्षमता अधिक बळकट झाली. अशा केंद्रीय प्रशिक्षण सत्रांचे आयोजन दर महिन्याला नियमितपणे करण्यात येईल.

## 4. Grade 9 Curriculum Planning Meeting

A curriculum planning session was conducted by Chitra Didi (Academic Coordinator) to strengthen instructional preparedness for Grades 8, 9, and 10. The curriculum was mapped from beginning to end, followed by a backward planning exercise for Grade 8 and Grade 9 teachers. Teachers identified expected learning outcomes and planned the teaching sequence, pacing, and curriculum coverage up to December. The session focused on both unit planning and weekly planning to ensure systematic classroom implementation. Since the planning session, weekly follow-up meetings have been conducted to monitor curriculum progress and identify students requiring remedial support. The initiative has improved teachers' understanding of curriculum expectations, instructional pacing, and targeted interventions for students. Regular review meetings have also promoted accountability, collaboration, and reflective planning. Going forward, one-on-one coaching will be provided to teachers requiring additional support, while remedial plans and a mid-year curriculum review will ensure timely curriculum completion and improved student learning outcomes.




इयत्ता ९ अभ्यासक्रम नियोजन बैठक

चित्रा दीदी (शैक्षणिक समन्वयक) यांच्या मार्गदर्शनाखाली इयत्ता ८, ९ आणि १० च्या शिक्षकांसाठी अभ्यासक्रम नियोजन बैठक आयोजित करण्यात आली. संपूर्ण अभ्यासक्रमाचे नियोजन करून इयत्ता ८ व ९ च्या शिक्षकांनी अपेक्षित अध्ययन निष्पत्ती लक्षात घेऊन बॅकवर्ड प्लॅनिंग केले. डिसेंबरपर्यंतचा अभ्यासक्रम, अध्यापनाचा क्रम, गती आणि वास्तववादी



THE AKANKSHA FOUNDATION MUMBAI-33


नियोजन निश्चित करण्यात आले. सत्रामध्ये युनिट प्लॅनिंग आणि आठवड्याच्या अध्यापन नियोजनावर विशेष भर देण्यात आला. त्यानंतर शिक्षकांसोबत दर आठवड्याला आढावा बैठका घेऊन अभ्यासक्रमाची प्रगती आणि अतिरिक्त शैक्षणिक मदतीची गरज असलेल्या विद्यार्थ्यांची ओळख करण्यात येत आहे. या प्रक्रियेमुळे शिक्षकांना अभ्यासक्रमाचे नियोजन, वेळेचे व्यवस्थापन आणि विद्यार्थ्यांच्या गरजांनुसार अध्यापन अधिक प्रभावीपणे करता येत आहे. पुढील काळात नियमित फॉलो-अप, वैयक्तिक मार्गदर्शन, उपचारात्मक अध्यापनाचे नियोजन आणि डिसेंबरपूर्वी अभ्यासक्रमाचा मध्यावधी आढावा घेऊन आवश्यक सुधारणा करण्यात येतील.

## STUDENTS VOICE AND WELL-BEING

### 1. Safety Session for Teachers

A teacher capacity-building session on Child Protection and Safety Protocols was conducted to strengthen staff awareness and preparedness in responding to student safety concerns. The session combined interactive discussions, case-based scenarios, quizzes, and practice-oriented activities to help teachers apply child protection principles in real-life school situations.

Key topics included school safety protocols, handling student disclosures with sensitivity, maintaining confidentiality, and appropriate documentation procedures. The training significantly enhanced teachers' confidence in responding to safety concerns while reinforcing the importance of creating a safe and supportive learning environment. Going forward, refresher sessions and scenario-based practice clinics will be organized to sustain learning, strengthen implementation, and ensure consistent adherence to child protection protocols across the school.



विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेशी संबंधित बाबींना प्रभावीपणे प्रतिसाद देण्यासाठी शिक्षकांची जागरूकता आणि तयारी वाढविण्याच्या उद्देशाने बाल संरक्षण व सुरक्षा प्रोटोकॉल या विषयावर क्षमता-विकास सत्र आयोजित करण्यात आले. या सत्रात संवादात्मक चर्चा, केस-आधारित परिस्थिती, प्रश्नमंजुषा आणि प्रत्यक्ष सरावावर आधारित उपक्रमांचा समावेश होता, ज्यामुळे शिक्षकांना शालेय परिस्थितींमध्ये बाल संरक्षणाची तत्त्वे प्रभावीपणे लागू करता आली.



THE AKANKSHA FOUNDATION MUMBAI-33

विद्यार्थ्यांच्या तक्रारी संवेदनशीलतेने हाताळणे, गोपनीयता राखणे, योग्य नोंद ठेवणे आणि शालेय सुरक्षा प्रक्रियांचे पालन करणे या महत्त्वाच्या बाबींवर विशेष भर देण्यात आला.

या प्रशिक्षणामुळे शिक्षकांचा आत्मविश्वास वाढला आणि सुरक्षित, आधार देणारे शालेय वातावरण निर्माण करण्यासाठी त्यांची बांधिलकी अधिक दृढ झाली. भविष्यात या विषयावरील पुनरावलोकन सत्रे व सराव कार्यशाळा आयोजित करून बाल संरक्षण प्रोटोकॉलची प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित केली जाईल.

**2. Visit to Art Exhibition**



A group of teachers and students visited the *How the Akanksha Children Found Their Colours* art exhibition at Khojkhidwadi, Girgaum, Mumbai. The exhibition showcased artworks created by children from the Akanksha Foundation, highlighting their creativity, emotions, and unique perspectives through various artistic techniques and themes.

The visit encouraged students to observe, interpret, and appreciate different forms of artistic expression. They reflected on the stories behind the artworks, strengthening their empathy, critical thinking, and creativity. The experience also boosted students' confidence in expressing their own ideas while fostering a deeper appreciation for art, culture, and diverse perspectives.

अकांक्षा फाउंडेशनच्या विद्यार्थ्यांनी साकारलेल्या *How the Akanksha Children Found Their Colours* या कला प्रदर्शनाला शिक्षक व विद्यार्थ्यांच्या गटाने गिरगाव, मुंबई येथे भेट दिली. या प्रदर्शनात विद्यार्थ्यांनी विविध चित्रकला तंत्र, रंगसंगती आणि विषयांच्या माध्यमातून व्यक्त केलेली त्यांची सर्जनशीलता, भावना आणि अनोखा दृष्टिकोन प्रभावीपणे मांडण्यात आला होता.

या भेटीद्वारे विद्यार्थ्यांना कलाकृतींचे निरीक्षण, त्यांचे अर्थ समजून घेणे आणि विविध कलात्मक अभिव्यक्तींचे कौतुक करण्याची संधी मिळाली. कलाकृतींमागील कथा आणि भावना समजून घेताना त्यांच्यामध्ये सहानुभूती, चिकित्सक विचारसरणी आणि सर्जनशीलतेचा विकास झाला. या अनुभवामुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढला तसेच कला, संस्कृती आणि विविध दृष्टिकोनांविषयी अधिक आदर आणि जाणीव निर्माण झाली.



THE AKANKSHA FOUNDATION MUMBAI-33

# NMMC SCHOOL NO. 93 (CBSE), NERUL

AKANKSHA
Aspire. Achieve. Be the Change.

3. **First Day – Reopening**



The school reopened on **15th June** with a vibrant and joyful welcome for students after the summer vacation. Teachers and staff greeted students with pom-poms, music, and cheerful smiles, creating an exciting atmosphere from the moment they entered the campus. Every student received a pencil and a chocolate as a welcome gift, while textbooks were distributed to ensure a smooth start to the academic year. The event was attended by the School Principal, teaching staff, SMC members, the corporator, and parents.

A special nursery activity encouraged students to prepare soil bags and plant fruit tree seeds brought from their homes, promoting environmental awareness and responsibility. The warm welcome strengthened students' sense of belonging, while the participation of parents and community members made the occasion even more meaningful. The reopening programme fostered enthusiasm, positivity, and readiness for learning, setting the tone for a successful and engaging academic year.

**१५ जून** रोजी उन्हाळी सुट्टीनंतर शाळेचे उत्साहपूर्ण वातावरणात पुनःप्रारंभ करण्यात आला. शिक्षक व कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांचे पम-पम, संगीत आणि आनंदी स्वागताने स्वागत केले, ज्यामुळे शाळेच्या पहिल्याच दिवशी उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. प्रत्येक विद्यार्थ्याला स्वागतपर भेट म्हणून एक पेन्सिल आणि चॉकलेट देण्यात आले. तसेच नवीन शैक्षणिक वर्षाची सुरुवात सुरळीत व्हावी यासाठी पाठ्यपुस्तकांचे वितरण करण्यात आले. या कार्यक्रमास शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षकवृंद, शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य, नगरसेवक तसेच पालक उपस्थित होते.

विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाबद्दल जागरूकता आणि जबाबदारीची भावना निर्माण करण्यासाठी विशेष उपक्रमांतर्गत त्यांनी घरून आणलेल्या फळझाडांच्या बियांची लागवड केली. या स्वागत कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये शाळेबद्दल आपलेपणाची भावना अधिक दृढ झाली. पालक आणि स्थानिक समुदायाच्या सहभागामुळे कार्यक्रम अधिक संस्मरणीय ठरला. सकारात्मक, आनंददायी आणि प्रेरणादायी वातावरणात नव्या शैक्षणिक वर्षाची सुरुवात होत विद्यार्थ्यांमध्ये शिकण्याविषयी उत्साह आणि आत्मविश्वास निर्माण झाला.



THE AKANKSHA FOUNDATION MUMBAI-33

### 4. International Yoga Day Celebration

The school celebrated **International Yoga Day** on **20th June** with great enthusiasm by organizing grade-wise yoga sessions for students. Conducted by the Physical Education Department, the sessions included yoga asanas, pranayama, breathing exercises, meditation, and relaxation techniques. Students actively participated in the activities, learning the importance of maintaining physical fitness, mental well-being, and emotional balance. The celebration emphasized yoga as a daily practice for leading a healthy and disciplined lifestyle.



The programme helped students understand the benefits of regular yoga in improving concentration, flexibility, self-discipline, and stress management. More than **800 students** participated in the celebration with enthusiasm and dedication. The event inspired students to adopt healthy habits and mindfulness in their daily lives while fostering a positive attitude towards holistic health and overall well-being.

**२० जून** रोजी शाळेत **आंतरराष्ट्रीय योग दिन** मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांमध्ये शारीरिक तंदुरुस्ती, मानसिक स्वास्थ्य आणि सजगता विकसित करण्याच्या उद्देशाने इयत्तानिहाय योग सत्रांचे आयोजन करण्यात आले. शारीरिक शिक्षण विभागाच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी विविध योगासने, प्राणायाम, श्वसन व्यायाम, ध्यान आणि विश्रांती तंत्रांचा सराव केला. या उपक्रमातून निरोगी, संतुलित आणि शिस्तबद्ध जीवनशैलीसाठी योगाचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावून सांगण्यात आले.

या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांना नियमित योगाभ्यासाचे अनेक फायदे समजले. योगामुळे एकाग्रता, लवचिकता, आत्मशिस्त आणि तणाव व्यवस्थापनाची क्षमता वाढते, याची जाणीव त्यांना झाली. **८०० हून अधिक विद्यार्थ्यांनी** उत्साहाने सहभाग नोंदवला. या उपक्रमाने विद्यार्थ्यांना दैनंदिन जीवनात योग, सजगता आणि निरोगी सवयी अंगीकारण्याची प्रेरणा दिली तसेच सर्वांगीण आरोग्य आणि सकारात्मक जीवनदृष्टी विकसित करण्यास मदत केली.

### 5. Stalls – Presentation at Community Day

Our school proudly showcased its innovative educational practices through interactive stalls at the **Community Day** held on **12th June 2026** at Balgandharv Auditorium. The exhibition highlighted five impactful initiatives, including Student Voice and Well-being, the Joy of Movement Course, the Developing Learners Programme, Differentiated Revision Plans, and Parent & Community Engagement



THE AKANKSHA FOUNDATION MUMBAI-33

through a Mehendi Workshop. Each stall demonstrated how these programmes support students' academic progress, personal development, emotional well-being, and active community participation.

The presentations reflected the school's commitment to inclusive and progressive education by sharing successful practices with educators, parents, and community members. Visitors appreciated the focus on student leadership, differentiated instruction, parent involvement, and holistic development. The event encouraged collaboration among schools and inspired the adoption of similar innovative approaches. Through these initiatives, the school reinforced the importance of strong school-community partnerships while celebrating meaningful learning experiences that empower both students and families.



**१२ जून २०२६** रोजी बालगंधर्व सभागृहात आयोजित **समुदाय दिन** कार्यक्रमात आमच्या शाळेने विविध नाविन्यपूर्ण शैक्षणिक उपक्रमांचे आकर्षक आणि संवादात्मक स्टॉलद्वारे यशस्वी सादरीकरण केले. या प्रदर्शनामध्ये **विद्यार्थी नेतृत्व व कल्याण**, **जॉय ऑफ मूव्हमेंट कोर्स**, **डेव्हलपिंग लर्नर्स प्रोग्राम**, **विभेदित पुनराभ्यास योजना** तसेच **मेहेंदी कार्यशाळेद्वारे पालक व समुदाय सहभाग** अशा पाच महत्त्वपूर्ण उपक्रमांचे प्रदर्शन करण्यात आले. या उपक्रमांद्वारे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीबरोबरच त्यांच्या वैयक्तिक विकास, भावनिक सक्षमीकरण आणि समुदायातील सक्रिय सहभागाला कशी चालना मिळते, हे प्रभावीपणे मांडण्यात आले.

या सादरीकरणातून शाळेची सर्वसमावेशक, प्रगत आणि विद्यार्थी-केंद्रित शिक्षणपद्धती अधोरेखित झाली. शिक्षक, पालक आणि इतर शाळांच्या प्रतिनिधींनी या उपक्रमांचे कौतुक केले. विद्यार्थी नेतृत्व, गरजेनुसार अध्यापन, पालकांचा सहभाग आणि सर्वांगीण विकास यांवर दिलेला भर विशेष लक्षवेधी ठरला. या कार्यक्रमामुळे विविध शाळांमध्ये सहकार्याची भावना वृद्धिंगत झाली आणि अशाच नाविन्यपूर्ण उपक्रमांची अंमलबजावणी करण्याची प्रेरणा मिळाली. शाळा व समुदाय यांच्यातील दृढ भागीदारी मजबूत करत विद्यार्थ्यांसह कुटुंबांच्या सर्वांगीण विकासासाठी हे उपक्रम महत्त्वपूर्ण ठरले.





# NMMC SCHOOL NO. 93 (CBSE), NERUL

## PARENTS COMMUNITY ENGAGEMENT & DEVELOPMENT

### 1. Goal Setting Orientation – Whole School

A Goal Setting Orientation was conducted for parents across the school to deepen their understanding of their children's holistic development. The session focused on three key areas: Academic Learning, Social and Emotional Learning (SEL), and Life Skills, highlighting the importance of setting meaningful goals that nurture every aspect of a child's growth.

Parents were introduced to the significance of Social and Emotional Learning and Life Skills in developing self-awareness, emotional regulation, empathy, effective communication, problem-solving, collaboration, and responsible decision-making. The session emphasized that these competencies are essential for building resilience, confidence, and responsible citizenship alongside academic success.




The orientation also encouraged parents to play an active role in their children's learning journey by creating a supportive home environment, reinforcing positive habits, and partnering with the school to achieve shared developmental goals. The interactive session strengthened the home-school partnership and reaffirmed the collective commitment to nurturing well-rounded, confident, and future-ready learners.

**ध्येयनिर्धारण मार्गदर्शन सत्र – संपूर्ण शाळा**

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी संपूर्ण शाळेतील पालकांसाठी *ध्येयनिर्धारण मार्गदर्शन सत्र* आयोजित करण्यात आले. या सत्रात शैक्षणिक अध्ययन, सामाजिक व भावनिक शिक्षण (SEL) आणि जीवनकौशल्ये या तीन महत्त्वपूर्ण घटकांवर मार्गदर्शन करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या केवळ



THE AKANKSHA FOUNDATION MUMBAI-33

शैक्षणिक प्रगतीबरोबरच आत्मजागरूकता, भावनांचे नियमन, प्रभावी संवाद, सहानुभूती, समस्या सोडविण्याची क्षमता आणि जबाबदार निर्णयक्षमता विकसित करण्यासाठी जीवनकौशल्यांचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. पालकांनी घरामध्ये सकारात्मक वातावरण निर्माण करून मुलांच्या शिक्षणात सक्रिय सहभाग घ्यावा व शाळेसोबत सहकार्याने त्यांच्या सर्वांगीण विकासाला पाठबळ द्यावे, असे आवाहन करण्यात आले.

**2. Community Visit – Teacher Practice Week**

As part of Teacher Practice Week, a Community Visit (Home Visit) was conducted to help teachers gain a deeper understanding of their students' family and community backgrounds. Teachers visited the homes of their assigned students and observed their living environment, family structure, and the support available for the child's learning. They also interacted with family members and observed the child's behaviour in the home setting. The initiative strengthened the partnership between teachers, parents, and students while providing valuable insights into each child's needs and circumstances, enabling teachers to offer more meaningful guidance and support for their overall development.

**समुदाय भेट – शिक्षक प्रात्यक्षिक सप्ताह**



शिक्षक प्रात्यक्षिक सप्ताहाच्या अंतर्गत *समुदाय भेट (गृहभेट)* उपक्रम आयोजित करण्यात आला. या उपक्रमाचा उद्देश शिक्षकांना विद्यार्थ्यांच्या कौटुंबिक व सामाजिक पार्श्वभूमीची अधिक चांगली ओळख करून देणे हा होता. शिक्षकांनी त्यांना नेमून दिलेल्या विद्यार्थ्यांच्या घरी भेट देऊन त्यांचे राहणीमान, कुटुंबातील सदस्य, शिक्षणासाठी मिळणारे सहकार्य आणि घरातील वर्तन यांचे निरीक्षण केले. पालकांशी संवाद साधून विद्यार्थ्यांच्या गरजा आणि विकासाबाबत माहिती मिळविण्यात आली. या उपक्रमामुळे शिक्षक, विद्यार्थी आणि पालक यांच्यातील विश्वास, संवाद आणि सहकार्य अधिक दृढ झाले तसेच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक मार्गदर्शन व सहाय्य प्रभावीपणे नियोजित करण्यास मदत झाली.

### 3. Parent Class – Kindergarten

On 20th June 2026, a Parent Class was conducted for Kindergarten parents to familiarize them with the school's academic programme, teaching methodology, classroom routine, and overall structure. During the session, books were distributed, and teachers demonstrated the **Read Aloud** strategy, encouraging parents to make it a daily practice with their children to enhance language and literacy development. The session also emphasized the importance of parental involvement in supporting learning at home. This was followed by a Goal Setting session conducted by the social workers, where parents were guided to set meaningful goals for their children's academic, social, emotional, and overall holistic development.




**पालक वर्ग – बालवाडी**

दिनांक **२० जून २०२६** रोजी बालवाडीतील पालकांसाठी *पालक वर्गाचे* आयोजन करण्यात आले. या सत्रामध्ये पालकांना शाळेचा शैक्षणिक कार्यक्रम, अध्यापन पद्धती, दैनंदिन दिनक्रम आणि वर्गरचनेची माहिती देण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांसाठी पुस्तकांचे वितरण करण्यात आले. शिक्षकांनी पालकांसमोर *वाचनपूर्वक कथाकथन (Read Aloud)* उपक्रमाचे प्रात्यक्षिक सादर केले आणि मुलांसोबत घरी नियमितपणे हा उपक्रम राबविण्याचे महत्त्व स्पष्ट केले. यामुळे मुलांच्या भाषिक व साक्षरता कौशल्यांच्या विकासास मदत होते. त्यानंतर सामाजिक कार्यकर्त्यांनी *ध्येयनिर्धारण सत्र* घेतले. या सत्रामध्ये पालकांना मुलांच्या शैक्षणिक, सामाजिक, भावनिक आणि सर्वांगीण विकासासाठी अर्थपूर्ण ध्येये निश्चित करण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

### 4. Nursery Orientation

An orientation session was conducted for Nursery parents to introduce them to the school environment, culture, and learning practices. As it was the children’s first year in school, parents were guided about the school timings, daily routines, classroom expectations, and important procedures. The session focused on age-appropriate teaching methods designed for young learners, including play-based and activity-based learning approaches. Parents were also made aware of their role in supporting their child’s early learning journey and smooth transition into school life. The orientation helped create a strong connection between parents and the school, fostering a positive foundation for the children’s holistic development.



THE AKANKSHA FOUNDATION MUMBAI-33

# NMMC SCHOOL NO. 93 (CBSE), NERUL

AKANKSHA
Aspire. Achieve. Be the Change.

**नर्सरी पालक मार्गदर्शन सत्र**



नर्सरी वर्गातील पालकांसाठी शाळेचे वातावरण, संस्कृती आणि शिकण्याच्या पद्धतींची ओळख करून देण्यासाठी मार्गदर्शन सत्र आयोजित करण्यात आले. विद्यार्थ्यांचे शाळेतील हे पहिले वर्ष असल्याने पालकांना शाळेची वेळ, दैनंदिन दिनक्रम, वर्गातील अपेक्षा आणि आवश्यक नियमांची माहिती देण्यात आली. लहान मुलांच्या वयोगटानुसार योग्य अशा अध्यापन पद्धती, खेळावर आधारित आणि कृतीशील शिक्षणाच्या पद्धती याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. तसेच मुलांच्या सुरुवातीच्या शिक्षणप्रवासात पालकांची भूमिका आणि सहभाग यांचे महत्त्व स्पष्ट करण्यात आले. या सत्रामुळे पालक आणि शाळा यांच्यात सकारात्मक संबंध निर्माण झाले व विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी भक्कम पाया तयार झाला.



THE AKANKSHA FOUNDATION MUMBAI-33